आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र दुपारी ३ वाजता

२४  मार्च २०२४ - रविवार

होळीचा सण आज सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. विशेषतः कोकणात काही दिवसांपासूनच होळीच्या पालख्या आणि होलिकादहनाची तयारी सुरु झाली आहे. अनेक चाकरमानी होळी निमित्त आपापल्या गावी गेले आहेत. त्यांच्यासाठी कोकण रेल्वेनं आणि राज्य परिवहन मंडळानं खास गाड्याही सोडल्या आहेत.

राज्यपाल रमेश बैस यांनी होळी तसंच धुलीवंदनानिमित्त जनतेला हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. परस्पर प्रेम, स्नेह आणि बंधुभावाचं प्रतिक असलेला रंगांचा हा सण सर्वांच्या जीवनात आनंदाचे रंग भरो, देशबांधवांमध्ये असलेली बंधुत्वाची भावना अधिक बळकट करो, ही प्रार्थना, असंही राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही नागरिकांना होलिकादहन आणि उद्याच्या धूलिवंदनानिमित्त शुभेच्छा समाजमाध्यमावर दिल्या आहेत. होळी निमित्त झाडं तोडू नये, पाण्याचा अपव्यय करु नये, तसंच धुळवड, रंगपंचमी खेळताना कृत्रिम रंगांचा वापर करु नये असं आवाहन पर्यावरणवादी संस्था संघटनांनी केलं आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी ४५ उमेदवारांची यादी काल काँग्रेसने जाहीर केली. अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या रामटेक लोकसभा मतदारसंघासाठी काँग्रेस पक्षाने नागपूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष असलेल्या रश्मी बर्वे यांना उमेदवारी दिली आहे. गडचिरोली-चिमूर मतदारसंघात  डॉ. नामदेव किरसान यांच्या

तर भंडारा गोंदिया मतदारसंघात डॉ. प्रशांत पडोळे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

<><><><><>

ख्रिस्ती समाजाच्या पवित्र आठवड्याला आज पाम संडे या दिवसानं प्रारंभ झाला. ईस्टर संडेच्या आधी एक आठवडा आणि गुड फ्रायडे पूर्वीचा हा महत्त्वाचा दिवस मानला जातो. आज ठिकठिकाणच्या चर्चमधून विशेष प्रार्थना घेण्यात आली.वाशिम इथं सकाळी नऊ वाजता ख्रिस्ती समाजाच्या नागरीकांनी नारळाच्या झावळ्या घेत चर्चमधून शांतता फेरी काढल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

योग्य वेळी घेतलेले धोरणात्मक निर्णय आणि आर्थिक सुधारणांमुळे देश कोविड संकटातून लवकर सावरला असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज बंगळुरु इथं थिंकर्स फोरम या संस्थेतर्फे आयोजित एका सत्रात बोलत होत्या. जागतिक समुदायानंही भारताच्या महामारीच्या काळातल्या कामाचं कौतुक केलं असल्याचही त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

भारतीय समभाग बाजारपेठेत परदेशी गुंतवणुकदारांनी केलेल्या गुंतवणूकीत या महिन्यात लक्षणीय वाढ दिसून आली.  फेब्रुवारीत 1 हजार 539 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय समभागात 38 हजार कोटींची गुंतवणूक परदेशी गुंतवणूकदारांनी केली आहे. जागतिक बाजारातली सुधारणा  आणि भारतातल्या

व्यापक  आर्थिक सुधारणांमुळे भारतातील संभाव्य तेजीकडे आकर्षित होत परदेशी गुंतवणूकदारांचा कल भारतात गुंतवणूक  करण्याकडे असल्याचं दिसत आहे.

<><><><><>

इंधनावरचं वाढतं अवलंबित्व आणि इंधनाची वाढती कमतरता याकडे लक्ष वेधलं जावं म्हणून मार्च महिन्याच्या शेवटच्या शनिवारी अर्थ अवर साजरा केला जातो. अर्थ अवर निमित्त काल रात्री साडेआठ ते साडेनऊ या वेळेत गरजेशिवाय जळणारे दिवे आणि इतर विजेवर चालणाऱ्या उपकरणांंचा वापर टाळला गेला. यातून दिल्लीत 206 मेगावॅट वीजबचत झाली. दिल्लीसोबतच मुंबई, लंडन, लॉस एंजलिस, सिंगापूर, दुबई या सर्व ठिकाणी गरज नसलेले दिवे आणि वीजेवरच्या उपकरणांचा वापर तासभर थांबवून अर्थ अवर साजरा झाला.

<><><><><>

अमरावती वरून मेळघाट मार्गे मध्य प्रदेशात जाणाऱ्या बसच्या अपघातात एका महिलेचा मृत्यु झाला असून ४० जण जखमी झाले आहेत. ही बस एका खोल दरीत कोसळून आज हा अपघात झाला. जखमींना सेमाडोह इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात भरती करण्यात आलं आहे.

<><><><><>

उन्हाळ्यात रुग्णालयात लागणाऱ्या आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि राष्ट्रीय आपत्ती प्राधिकरणाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना त्यांच्या अधिकारक्षेत्रातल्या रुग्णालयासाठी  संयुक्त मार्गदर्शक सूचना

दिल्या आहेत.  रुग्णालयांची सर्वसमावेशक अग्निसुरक्षा ऑडिट आणि प्रत्यक्ष तपासणी करावी, धोक्याचा अलार्म,  धूर शोधक यंत्र, फायर हायड्रंट्स आणि फायर लिफ्ट्ससह अग्निरोधक यंत्रणा उपलब्ध आहे आणि ती पूर्णपणे कार्यरत आहे, याची खात्री करावी इत्यादी सूचनांचा त्यात समावेश आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दुपारी साडेतीन वाजता राजस्थान रॉयल्सचा सामना लखनऊ सुपर जायंटस बरोबर होणार आहे. जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर हा सामना होणार आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे.

आज संध्याकाळी साडेसात गुजरात टायटन्स विरुद्ध मुंबई इंडियन्स हा सामना अहमदाबादमध्ये खेळवला जाणार आहे.

काल कोलकात्याच्या इडन गार्डन्स इथं संध्याकाळी झालेल्या सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सनं सनराईजर्स  हैद्राबाद चा ४ धावांनी पराभव केला. कोलकाता नाइट रायडर्सनं विजयासाठी २०९ धावाचं लक्ष्य ठेवलं होतं मात्र हैद्राबादच्या संघाला २० षटकात केवळ २०४ धावाचं करता आल्या.

//<><><><><>//